# <u>ऊठ मुला</u>

- बालकवी



ऊठ मुला ऊठ मुला

बघ हा अरुणोदय झाला |

किलबिलती बागडती

झाडांवरती पक्षी किती |

फुलांवरी फळावरी

पतंग मोदे मजा करी |

शीतल हा वात पहा

आळस हरण्या येत अहा |

पूर्वेला रवी आला

मुला उठाया कथित तुला |

~~~~~

(त्रिवेणी मराठी शाळा, सिनसिनाटी, ओहायो)
~~~~~